**प्रेसनोट** **दि.०६/०८/२०१९**

# बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे शहर

## दहिहंडी उस्तव साजरे करणारे मंडळाची बैठक घेतले बाबत

दिनांक ०६/०८/२०१९ रोजी सायंकाळी १७.०० ते १७.३० वा चे दरम्यान बिबवेवाडी पोलीस ठाणे येथे कम्युनिटीग पोलीसींग च्या अनुशंगाने दहिहंडी उत्सवा निमित्त दहिहंडी साजरी करणा-या मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती.सदर बैठकी मध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे यांनी दहिहंडी उत्सव साजरा करताना दोन स्पिकर बॉक्स पेक्षा जास्त स्पिकर लावण्यात येवू नये डी जे डॉल्बीचा वापर करण्यात येवू नये आवाजाची तिव्रता वाढल्यास ध्वनी प्रदुषण कायदयान्वये कारवाई करण्यात येईल तसेच वाहतुकीस अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी. दहिहंडी करीता क्रेनचा वापर करू नये दहिहंडीची उंची कमी ठेवण्यात यावी लहान मुलांना दहिहंडी फोडण्यासाठी सामील करण्यात येवू नये. तसेच दहिहंडी फोडताना पाण्याचा वापर होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच त्यांना पोलीसांनी सुरु केलेल्या सेवांबाबत भरोसा सेल, महिला सुरक्षा, कम्युनिटि पोलीसींग, रक्षा ॲप, सेवा ॲप, बडी कॉप, पोलीस काका, अंतर्गत सुरु असणारे योजनांची त्यांना माहिती दिली व त्याबाबत त्यांचे अभिप्राय जाणून घेतले. व पोलीस ठाणे हद्दीत कोणताही अनुचित प्रकार असल्यास त्याबाबत आम्हास तात्काळ कळविणे बाबत आव्हाण केले आहे.

सदर बैठकीस वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे, व गोपनीयचे कर्मचारी यांच्यासह दहिहंडी साजरा करणा-या मंडळाचे अध्यक्ष व कार्यकर्ते असे २० ते २५ सदस्य हजर होते.





